ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेमध्ये पुन:स्थापित करणे बाबत.
(श्री.रावसाहेब एकनाथ डौले, तत्कालीन ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर)

२०२५०९१६०७०११८

जिल्हा परिषद अहिल्यानगर

ग्रामपंचायत विभाग

आदेश क्र. साप्रवि-२/ग्रापं-३/ई.क्र. १६६६२९३

दिनांक -१६ / ०९ /२०२५

संदर्भ - १.या कार्यालयाचे आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/१२२५६३८/२०२५ दि.०८/०५/२०२५ (सेवा निलंबन आदेश)

२. या कार्यालयाचे ज्ञापन दोषारोप क्र.ई क्रमांक १२२५६४६ दिनांक ०८/०५/२०२५

३. श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी यांचा दोषारोप खुलासा दिनांक १७/०६/२०२५.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(३)

५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम (६)(५)

६. शासन निर्णय क्र.निप्रआ११२२/प्र.क्र.०९/विचौ२/२०२५,दिनांक २२ एप्रिल २०२५

७. सेवा निलंबन आढावा समिती मधील सूचना दि.०७.०७.२०२५.

संदर्भ क्रमांक ०१ चे आदेशान्वये श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर येथे कार्यरत असताना त्यांनी त्यांचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर केल्याने तसेच ग्रामसभेच्या आगोदर घेण्यात येणारी महिला सभा न घेणे ,कार्यालयीन आदेशाचा अवमान करणे अशा प्रकारचे ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने जिल्हा परिषद सेवेतुन सेवानिलंबित करणेत आलेले आहे.

संदर्भ क्र.०२ चे ज्ञापनान्वये श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांचे गैरवर्तना बाबत एकूण ०२ दोषारोप ठेवून शिस्तभंग विषयक कार्यवाही सुरु केलेली आहे. त्याबाबतचे दोषारोपपत्र त्यांना बजावण्यात आलेले आहेत.

संदर्भ क्र.७ मधील चर्चेनुसार व संदर्भ क्रमांक ६ चे शासन निर्णयानुसार श्री. रावसाहेब एकनाथ डौले सेवा निलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचा यांचा निलंबन कालावधी हा तीन महिन्यांपेक्षा अधिक झालेला असल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे पोट नियम ३(५) नुसार, प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर तथा सक्षम प्राधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावर जिल्हा परिषद सेवेत पंचायत समिती ----शेवगाव---- येथे पुन:स्थापित करीत आहे.

श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर यांचा या सेवा निलंबन कालावधीचा निर्णय,पुढील सुरु असलेली शिस्तभंगविषयक कार्यवाही पुर्ण झालेनंतर स्वतंत्ररित्या घेण्यात येईल.जिल्हा परिषद सेवेत पुन:स्थापित आदेशाची नोंद,श्री. रावसाहेब एकनाथ डौले, सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुळ सेवा पुस्तकात संबधीत खाते प्रमुख यांनी घ्यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०९१६०६०११८ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 16-09-2025 19:06:55

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.रावसाहेब एकनाथ डौले ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत माळवडगाव तालुका श्रीरामपूर (सेवानिलंबन मुख्यालय पंचायत समिती राहुरी)

व्दारा :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती राहुरी

२/-सोबतचा आदेश संबंधीतास बजावून तो मिळालेबाबतची पोहच कार्यालयास अहवाल सादर करावी.

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती श्रीरामपुर/राहुरी यांना पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी

प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती ----शेवगाव----

२/- श्री. रावसाहेब एकनाथ डौले सेवानिलंबीत ग्रामपंचायत अधिकारी हे हजर झालेनंतर अहवाल इकडेस सादर करावा.